# राशिभविष्य – जानेवारी, २०११

## दादा दामले (dadadamle@hotmail.com)

**(१) मेष**

या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात केवळ शुक्र ग्रहच काही प्रमाणात अनुकुल होणार असून महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात मात्र नोकरदार मंडळींना कामाचा ताण, विरोध, भांडणे यांमुळे मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडून अधिक प्रमाणात लाभ होणे संभवते. बुध केवळ महिन्याच्या प्रथम सप्ताहातच अनुकुल असेल व त्याच काळात अपेक्षित असे सर्व काही साधून घेणे शक्य होईल. नंतर मात्र मनस्तापदायक घटनाच घडतील. स्वतंत्र उद्योग-व्यवसाय करत असणारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल. प्रवास आवश्यक असेल तरच करा. त्रास होण्याची शक्यता आहे. धर्म-आध्यात्म यांत विशेष रस असणारांना व सामाजिक कार्यात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व सुखसमाधान देणारा असा सिद्ध होईल. हर्षल-नेपच्यूनमुळे सांपत्तिक अडचणी, आर्थिक नुकसान, आर्थिक लाभात घोटाळे, विलंब होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक जीवनात त्रास, अपेक्षाभंग ,भांडणे होणे शक्य दिसते. सर्व प्रकारच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. या राशीच्या विद्यार्थ्यांनी कुमार्गी मित्रांपासून सावध राहावे. असह्य मनस्तापामुळेच या राशीच्या काही मंडळींना शारीरिक- मानसिक अनारोग्यास सामोरे जावे लागेल. जपा.

**(२) वृषभ -**

कोणतेही बौद्धिक व्यवसाय क्षेत्र, शास्त्रीय संशोधन क्षेत्र, मानसोपचार क्षेत्र, कायदा क्षेत्र, शिक्षण क्षेत्र असे व्यावसायिक क्षेत्र असणारांना व द्रव पदार्थांचा व्यापार असणारांना प्रगतीचे दृष्टीने या महिन्याचा काळ अतिशय अनुकुल होईल. पण या राशीच्या विद्यार्थ्यांना मात्र मानसिक मरगळ येण्याची शक्यता दिसते. तसेच मित्रांशी भांडणे झाल्यामुळे मनापासून अध्ययन करणे अशक्य होईल..जपा. विशेष करून महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या काही मंडळींना उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. काहींना अपघातामुळे हडमोड सहन करावी लागेल. काहींना प्रवासात असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा जीवनसाथीस कसला तरी त्रास असल्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी या महिन्याचा काळात अतिशय संयमाने व सहनशीलने वागूनच प्रतिकुल काळ सुसह्य करावा. विविध कारणांनी अनपेक्षित खर्च करावा लागल्यामुळे आर्थिक चिंता उत्पन्न होऊ शकेल. जपा. कोणत्याही प्रकारच्या नोकरीत वाममार्ग धन सहज प्राप्त होणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळणेच सुखाचे होईल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो.

**(३) मिथुन -**

जीवनसाथीचे अनारोग्य किंवा मतभेद यांमुळे किंवा अन्य कारणांनी वैवाहिक व कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. काहींना असह्य मनस्तापामुळे उष्णताविकारांचा, अपचनाचा, पोटविकाराचा त्रास सहन करावा लागेल. अध्यात्म, उपासना अशा क्षेत्रात रस असणारांना प्रगतीच्या दृष्टीने व मन:शांतीचे दृष्टीने काळ अनुकुल होईल. काहींना मातृचिंता तर काहींना स्थावर संपत्तिविषयक चिंता त्रस्त करील. विचाराच्या तंद्रीत वाहने

चालवू नका. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. दशम स्थानी गुरुसह हर्षल असल्यामुळे या राशीच्या शैक्षणिक, शास्त्रीय संशोधनात्मक, वकिली, हिशेब अशा बौद्धिक चिकित्सा कार्यक्षेत्रांत कार्यरत असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. काहींना मानसन्मान प्राप्त होईल. बढती मिळेल. मात्र असे लाभ विशेष करून महिन्याच्या प्रथम सप्ताहातच संभवतात. अपेक्षित शैक्षणिक प्रगतीसाठी या राशीच्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखणे आवश्यक होईल. प्रेमप्रकरणे असतील तर त्यात गैरसमजाने बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

**(४) कर्क -**

या राशीच्या काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची तर काहींना मनपसंत नोकरी मिळण्याची शक्यता दिसते. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांना परधर्मीयांकडून अधिक अर्थलाभ होणे संभवते. भागीदारी व्यवसाय असणारांनी भागीदाराशी मतभेद होणार नाहीत याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. कोणत्याही प्रकारच्या नोकरीत महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. गूढ शास्त्रीय संशोधन व अध्यात्म विषयांत रस असणारांना प्रगती व सात्विक सुख समाधान मिळण्यास काल अनुकुल होईल. मात्र काहींना भावंडविषयक चिंता त्रस्त करील. या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे किंवा परदेशप्रवासाचे योग येतील. महिन्याच्या प्रथम सप्ताहात मुले मनाविरुद्ध वागतील; पण नंतर सर्व काही सुरळीत होईल. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव थोडा लहरी होण्याची शक्यता आहे. भाग्यस्थानातील स्वराशीच्या गुरुमुळे सद्गुणांची वाढ होईल व प्रगतीच्या संधी चालून येतील. मंगळ पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या काहींचे आरोग्य बिघडणार असून उष्णताविकार, रक्तविकार बळावण्याची शक्यता आहे. हृदयविकार असणारांनी मनक्षोभ होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच वैवाहिक जीवनात होणारे मतभेद विकोपाला जाणार नाहीत याची काळजी घ्यावी.

**(५) सिंह -**

विशेष करून या राशीच्या मंडळींना संततिसुखाचे दृष्टीने या महिन्याचा काळ अतिशय प्रतिकुल आहे. संततीचे आजार, संततीचे मनाविरुद्ध वागणे यांमुळे मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. अकारण दगदग करू नये. मनस्तापामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकार, रक्तविकार बळावण्याची शक्यता आहे. हृदयविकार असणारांनी मनस्ताप होणार नाही याची काळजी घ्यावी. सतत विविध प्रकारे मन अस्वस्थ करणाया घटना घडतील. बागाईत शेती व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. कोणावरही फ़ाजील विश्वास टाकू नका. फ़सवणूक होणे संभवते. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे. विचारशक्ती व मन:शांती शाबूत ठेवूनच संयम व सहनशीलतेने आचरण करणेच सुखाचे होईल. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही भाग्यवंतांना अचानक धनलाभ होण्याची किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. विचाराच्या तंद्रीत वाहन चालवू नका. अपघात भय आहे. या राशीच्या काहींना अपप्रचाराचा तर काहींना चोरीमुळे वा अनपेक्षित खर्चामुळे आर्थिक हानीस तोंड द्यावे लागेल. नोकरी-व्यवसायात अपेक्षित असे घडून येण्यासाठी श्रद्धापूर्वक कुलदेवतेची उपासना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर प्रतिकुल काळ सुसह्य होण्यासाठी रामरक्षा व हनुमानचालिसा स्तोत्राचे नित्य पठण करावे.

**(६) कन्या -**

या राशीच्या मंडळींना या महिन्याचा एकूण काळ फ़ारसा अनुकुल नाहीच असेच म्हणावे लागते. केवळ शुभ ग्रहांच्या अनुकुलतेनुसार मधून मधून मानसिक सुखसमाधान देणारया् घटना घडतील. या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींना उगीचच काल्पनिक आजारभावना होण्याची शक्यता आहे. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होऊन असह्य मनस्तापामुळे शारीरिक आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. वैवाहिक व कौटुंबिक जीवनात वाद, मतभेद, गैरसमज, वितुष्ट यांमुळे गहरे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या काही मंडळींना कौटुंबिक वास्तव्यातून स्थलांतर करावे लागण्याची शक्यता दिसते. तसेच या राशीच्या काहींना संततिविषयक समस्यांमुळे मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारी व्यापार-व्यवसाय असेल त्यांना भागीदारीत बाधा येणार नाही याची विशेष काळजी घ्यावी लागेल. स्वराशीच्या गुरुच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. तसेच प्रेमप्रकरणे असतील तर प्रेमसंबंध दृढ होतील. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्रहकांकडूनच अधिक धनलाभ होणे संभवते.

**(७) तुळा -**

शनि-हर्षल पूर्णपणे व रवि-मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, मनाविरुद्ध घडणारया घटना, कोर्टप्रकरणे, अशापैकी घटनांमुळे असह्य त्रास व आर्थिक हानी होणे संभवते. अत्यंत सावधानतेने आचरण करा, मन व बुद्धी स्थिर ठेवा, म्हणजे आरोग्य बिघडणार नाही व आर्थिक नुकसान होणार नाही. कलाक्षेत्रातील मंडळींना या महिन्याचा काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. विशेषतः राजकारण, छायाचित्रण अशा व्यवसायात असणारांना काळ अनुकुल होईल. पण भावंडांशी मतभेद, भांडणे होण्याची शक्यता आहे. जपा. अति अनावश्यक विचारामुळे मेंदूवर ताण पडू शकेल. म्हणून मन व बुद्धी सतत शांत ठेवण्याचा प्रयत्न करा, अत्यंत संयमाने व सहनशीलतेने आचरण केलेत तरच प्रतिकुल काळाशी टक्कर देऊ शकाल. काळ शनिदेवांच्या साडेसातीचा आहे हे ध्यानात ठेवूनच सदैव नम्रतेचे आचरण केलेत तरच तुकोबा म्हणतात-- "महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती" तसे तुम्ही सुरक्षित राहू शकाल. विशेष करून दिनांक २५-२६ हे दोन दिवस अतिशय सावधानतेने सर्व व्यवहार करा. शासकीय, निम-शासकीय नोकरीत असणारांना महिन्याचा पूर्वार्ध सर्वांगीण प्रगती साधण्यास अनुकुल होईल. मुलांच्या बाबतीत विविध समस्यांमुळे संततिसुख मिळणे शक्य होणार नाही. जपा.

**(८) वृश्चिक -**

श्रद्धा असेल तर या राशीच्या मंडळींनी प्रापंचिक सुखासाठी व आरोग्यसंपन्नतेसाठी भगवान शंकराची उपासना करावी. रक्तविकार, त्वचाविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. उष्णतेमुळे तोंड येणे, दात दुखणे, घसा दुखणे, नेत्रविकार असे आजार संभवतात. अपघातभय आहे. जपा. वकिली, हिशेब असे चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना काळ अतिशय अनुकुल होईल व अपे़क्षित प्रगती व अर्थलाभ सहज होईल. पण कौटुंबिक जीवनात भांडणे, गैरसमज, मतभेद अशापैकी कारणांनी अशांत परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता दिसते. अविचाराने खर्च होणार नाही याची काळजी घेतलीत तर आर्थिक चिंता करावी लागणार नाही. पण आर्थिक जबाबदारी आली तर मात्र आर्थिक चिंता करावी

लागेल. महिन्याच्या पूर्वार्धापेक्षा महिन्याचा उत्तरार्ध अधिक अनुकुल होईल. नोकरी-व्यवसायात महिन्याच्या उत्तरार्धातच अधिक अनुकुल व लाभदायक घटना घडतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना उच्च शैक्षणिक प्रगतीस काळ अतिशय अनुकुल आहे. आरोग्यसंपन्न राहून कठोर मेहनत केल्यास अपेक्षित यश लाभेलच. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो. प्रेमसंबंध असतील तर ते घट्ट होण्यास काळ अनुकुल होईल.

**(९) धनु -**

या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि, मंगळ हे दोन ग्र अतिशय प्रतिकुल असणार आहेत. मनस्ताप, आप्तेष्ट भांडणे, वाढता खर्च, दगदग यांमुळे अनारोग्य होऊन या राशीच्या काही मंडळींना रक्तदाब, हृदयविकार, नेत्रविकार, उष्णताविकार, घसा, दात, मान दुखणे असे आजार संभवतात. येणे असेल तर मिळणे कठिण; पण खर्च मात्र करावाच लागेल. मानी स्वभाव असल्यामुळे मनाविरुद्ध घडणारया घटनांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. या काळात कोणाशीही पटणार नाही. राहत्या जागेतही अस्वस्थच वाटेल. गुरुच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण नातेवाईक मंडळींशी भांडणे होण्याची शक्यता आहे. अध्यात्म, गूढ संशोधन यात रस असणारांना प्रगती साधणे व यश मिळविणे सहज शक्य होईल. लोखंड-पोलाद अशा धातूंचा व्यापार असणारांना काळ बरा जाईल; पण अन्य व्यवसायांस प्रतिकुलतेचाच अनुभव येईल. विशेष करून दिनांक २३-२४ या दोन दिवशी अनपेक्षित असे काही तरी घडेलसे दिसते. काहींना परदेशगमनाचे तर काहींना जलप्रवासाचे योग येतील. स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होतील. अशा काळात बुद्धी विकृत होण्याची शक्यता असते. जपा. वैवाहिक जीवनात मात्र सुखसमाधान लाभेल. मात्र नम्रतेचे आचरण होणे आवश्यक आहे.

**(१०) मकर -**

या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ काही अनुकुल तर काही प्रतिकुल अशा संमिश्र प्रकारचे अनुभव देणारा असा असणार आहे. रवि, मंगळ, राहू, नेपच्यून हे ग्रह प्रतिकुल अनुभव देतील, तर गुरु, बुध, शुक्र, हर्षल हे ग्रह सुखसमाधान देतील. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. व्यापार-व्यवसायात मनासारखे काहीच घडत नसल्याने, तसेच सतत माघार घ्यावी लागत असल्याने, शारीरिक उश्णता भडकून अनारोग्यास तोंड द्यावे लागेल. विशेष करून स्त्री-समाजाकडून मनस्तापकारक प्रसंग घडण्याची शक्यता दिसते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मन व बुद्धी सतत शांत ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इतर आरोग्य उत्तम राहील. शनिदेव फ़ारसे प्रतिकुल असणार नाहीत. काहींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. गुरु-हर्षलमुळे उच्च बौद्धिक क्षेत्रात कार्यरत असणारांना गहन प्रश्न सोडविल्याचा आनंद व सुखसमाधान लाभेल. अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. वैवाहिक व कौटुंबिक जीवनात सुखसमाधान लाभेल. प्रतिष्ठित समाजातील लोकांशी घनिष्ट संबंध असणारांना त्यांच्या मदतीने कोणत्याही व्यवसायात यश लाभेल. या राशीच्या काही मंडळींकडून ग्रंथलेखन पूर्णत्वास जाईल. पण भावंडांकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे.

**(११) कुंभ -**

या राशीच्या मंडळींना महिन्याच्या पूर्वार्धातच रवि ग्रह अनुकुल आहे. नोकरी-व्यवसायात जे काय

साधून घ्यावयाचे ते पूर्वार्धातच साधून घ्या. उत्तरार्धात विविध कारणांनी मनस्ताप व नको ते घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काहींना नोकरीत बढती, मानाचे स्थान मिळणे शक्य दिसते. मंगळामुळे मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता आहे. जपा. काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. नेपच्यूनमुळे या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचे मन अतिशय हळवे,कोमल राहणार आहे. त्यामुळे मनाविरुद्ध काहीही घडले तर असह्य मानसिक त्रास सहन करावा लागेल. रविप्रमाणेच मंगळही उत्तरार्धात प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे विविध कारणांनी नैराश्य येणे, जुनी दबलेली प्रकरणे पुन्हा उकरली जाऊन असह्य मनस्ताप होणे , भांडणे होणे, गैरसमजुतीने मत वाईट होणे, अशापैकी त्रास होण्याची शक्यता दिसते. गुरुच्या अनुकुलतेने अपेक्षित अर्थलाभ होणार असला तरी हर्षलमुळे अविचाराने किंवा इच्छेविरुद्ध अपेक्षेपेक्षा अधिक खर्च होण्याची शक्यता दिसते. संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या काहींना मोठ्या आजाराला तोंड द्यावे लागेल. पण कुटुंबात शुभ घटना घडतील. स्वतंत्र व्यवसाय असेल तर त्यात प्रगती होईल. सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी मनावर ताबा ठेवा, जिभेला लगाम घाला व विचारपूर्वक कृती कारा.

**(१२) मीन -**

या राशीच्या मंडळींना नोकरी--व्यवसायाच्या दृष्टीने काळ अतिशय अनुकुल आहे. मनोनुकुल घटना घडतील. मोठ्या पदावरील कोणाच्या तरी ओळखीतून लाभदायक घटना घडतील. काहींना पदोन्नती मिळेल. पण स्वतंत्र व्यवसाय असणारांना मनासारखे काही घडत नसल्याने काही तरी नवीन व्यवसाय करावासा वाटेल. नोकरीत महिन्याच्या पहिल्या सप्ताहात कामाचा ताण पडून वरिष्ठांशी वाद, मतभेद होणे संभवते. नंतर काहींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होण्याची शक्यता आहे. तर काहींना मित्राशी वितुष्ट आल्याची रुखरुख लागेल. स्वराशीच्या गुरुमुळे या राशीच्या मंडळींकडून गहन विषयावर लेखन होईल व त्यात यश येऊन प्रसिद्धी मिळेल. आरोग्य उत्तम राहील पण हर्षलमुळे मन अस्वस्थ, चंचल होईल व स्वभाव लहरी होईल. श्रद्धा असेल तर गृहसौख्यासाठी या राशीच्या मंडळींनी कुलदेवतेची व भगवान शंकराची उपासना करावी. या राशीची जी लहान मुले असतील ती अतिशय हूड व व्रात्य होण्याची शक्यता आहे. पालकांनी त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवावे. नपेक्षा अकारण अनिष्ट परिणाम सहन करावे लागतील. पतिपत्नीपैकी एकाचे अनारोग्यामुळे व दुसयास आलेल्या नैराश्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या युवकांनी कुमार्गी मित्रांपासून दूर राहावे.

\- ----ooooo-----